॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++' grade

## DEPARTMENT OF EAMINATION (ELIGIBILITY SECTION)

Phone:(02462) 215242,43,44 Website:www.srtmun.ac.in E-mail:eligibility@srtmun.ac.in

Ref.No. :Exam./Eligibility/2026-27/798 Date :- 23/06/2026

## सुधारीत परिपत्रक

**(NEP-2020 पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता)**

**विषय: Online पात्रता आवेदन पत्र सादर कारणे बाबत**

**टिप :– शासनाने निर्गमित केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांचे ABC ID/APAAR ID पात्रता आवेदन पत्रात नमुद करणे बंधनकारक आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संलग्नित पदवी व पदव्युत्तर महाविद्यालय, सर्व संकुले प्रस्तुत विद्यापीठ, उपकेंद्र लातूर, उपपरिसर, परभणी, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली आणि कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शै.वर्ष २०२६–२७ करिता पात्रता आवेदन पत्र **ऑनलाईन** सादर करणे, पात्रता शुल्क व पात्रतेच्या यादया व इतर कागदपत्रासह माहिती विद्यापीठात सादर करावयाचे वेळापत्रक खालील प्रमाणे राहील.

**पात्रता शुल्क तक्ता**

| अ.क्र. | विवरण | शुल्क ( रूपये ) |
|---|---|---|
| १ | मराठवाडयातील विद्यार्थ्यांकरीता | १२६/– |
| २ | मराठवाडा क्षेत्राबाहेरील, परंतू महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरीता | २४२/– |
| ३ | महाराष्ट्र राज्याबाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता | ५८८/– |
| ४ | परदेशीय विद्यार्थ्यांकरीता | ८१९/– |

**पात्रता आवेदन पत्र दाखल करण्याचे वेळापत्रक**

| अ. क्र. | विवरण | पात्रता आवेदनपत्र ऑनलाईन सादर करण्याचा अंतिम दिनांक | पात्रता आवेदन पत्र शुल्काचा Online करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पात्रता आवेदन पत्र सादर करणे | ३१/०८/२०२६ | ०१/०९/२०२६ |
| २ | सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी पात्रता आवेदन पत्र सादर करणे | केंद्रिय पध्दतीने प्रवेश प्रक्रीया होत असल्यामुळे कटऑफ दिनांका पासून दहा दिवसा पर्यंतचा कालावधी | कटऑफ दिनांकापासून पंधरा दिवसा पर्यंतचा कालावधी |

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे Online पात्रता आवेदन पत्र हे मागील वर्षीप्रमाणे विद्यापीठ संकेत स्थळावरील Online Exanination Portal वरील Scroling Logo पदवीसाठी New Exanination Portal व पदव्युत्तरसाठी UG/PG Elgibility Portal या व्दारे माहिती सादर करावी.

**पात्रता आवेदन पत्र शुल्क हे विद्यापीठ संकेत स्थळावरील Online Payment चा वापर करावा.**

**वरील प्रमाणे ऑनलाईन सादर केलेल्या पात्रता यादीची प्रिंट, Online Payment केलेली पावती जिल्हा निहाय केंद्रावर सादर करण्याचा दिनांक व ठिकाण खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | जिल्हा | महाविद्यालय | दिनांक | पात्रता यादी व पावती सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | सर्व महाविद्यालये | ०३/०९/२०२६ | पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ |
| २ | लातूर | सर्व महाविद्यालये | ०३/०९/२०२६ | उपकेंद्र पेठ, लातूर |
| ३ | परभणी | सर्व महाविद्यालये | ०३/०९/२०२६ | उपपरिसर, परभणी |
| ४ | हिंगोली | सर्व महाविद्यालये | ०३/०९/२०२६ | न्यु.मॉडेल कॉलेज, हिंगोली |

## प्रवेशीत विद्यार्थ्यांची पात्रता घेण्यासाठी महाविद्यालयास विशेष सुचना व नियम

१) प्रस्तूत विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षात अनुतीर्ण होऊन त्याच वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे ही पात्रता आवेदनपत्र ऑनलाईन सादर करावे.

२) पदवी परीक्षेच्या प्रथम वर्षात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांने १०+२ या शैक्षणिक आकृती बंधाप्रमाणे मान्यता प्राप्त बोर्डाचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला असणे आवश्यक आहे.

३) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश देते वेळी विद्यार्थ्यांना पदवी उतीर्ण (३वर्ष) या शैक्षणिक आकृती बंधाप्रमाणे UGC व शासनमान्य विद्यापीठातुन अभ्यासक्रम पुर्ण केलेला असणे आवश्यक आहे. तसेच M.A. व M.Sc. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश देताना त्या – त्या विषयातील ६६ क्रेडीट पूर्ण करणे अनिवार्य आहे, त्या शिवाय प्रवेश देण्यात येऊ नये.

४) शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्राची (T.C.) मुळप्रत हरवल्यास, त्याची पूर्ण खात्री करून, त्याबाबतीत टी. सी.ची द्वितीय –प्रत घेऊन प्रवेश देण्यात यावा. मात्र अशा प्रवेशाच्या संदर्भात कालांतराने चुकीची माहीती निदर्शनास आल्यास असे प्रवेश रद्द करण्यात येतील व त्यामुळे होणाऱ्या सर्व परिणामाची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील.

५) काश्मीरी निर्वासित व्यक्तीच्या पाल्याच्या प्रवेशासाठी या विद्यापीठाचे परीपत्रक. Acad/Elig/Admn/२००४. ०५/३८९०.४०८९ दिनांक २३/३/२००५ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

**६) महाविद्यालयाने सादर केलेली पात्रता यादी हिवाळी २०२६ या परीक्षेच्या प्रवेश पत्र (Admit Card) तयार करणेसाठी वापरण्यात येणार असल्याने, प्रवेशीत विद्यार्थ्यांची पात्रता यादी तयार करतांना ज्या गुणपत्रका– आधारे प्रवेश देण्यात येणार आहे, त्या गुणपत्रकावरचे नाव अचूक टाईप करुन त्याने निवडलेल्या विषयासह यादी सादर करावी, झालेल्या चूकीमुळे विद्यार्थ्यांचा निकाल EC मध्ये राहिल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहील.**

७) ज्या विषयास मान्यता/ संलग्निकरण आहे, त्याच विषय/विषय ग्रुप साठी प्रवेश देणे बंधनकारक आहे. दुस–या विषयाचे नाव/ग्रुप निवडुन परीक्षा दिल्यास त्यांची घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात येईल.

८) पात्रता यादया ०३ प्रती मध्ये सादर कराव्यात.

**९)शैक्षणिक वर्ष २०२६– २७ साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची पात्रता यादी सारद करण्यापुर्वी संलग्निकरण, क्रीडा, विद्यार्थी कल्याण, राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) या विभागाचे NO DUES हे त्या त्या विभागातील Online पोर्टलवर दाखल केल्यानंतरच पात्रता यादी प्रिंट करता येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

१०)महाविद्यालयांनी संबंधीत अभ्यासक्रमाच्या पात्रतेचे प्रचलित नियम/निकष पाहुनच विद्यार्थ्यांनां प्रवेश दयावेत. निकष/नियमबाहय प्रवेश दिल्यास, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानिसाठी व त्याअनुषंगाने न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

**११)पात्रता यादया सादर करतांना महाविद्यालयाने पात्रता आवेदन पत्रासोबत विद्यापीठ संलग्निकरणाची प्रत जोडणे आवश्यक आहे.**

१२)महाविद्यालयास पात्रता शुल्क पावती, पात्रता आवेदनपत्र दाखल न केल्यास/मुळ प्रमाणपत्र तपासणी करण्यास विलंब झाल्यास विहीत तारखेनंतर प्रति दिवस रू. १००/–विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१३)प्रस्तुत विद्यापीठाचे पदवीधारक विद्यार्थी पद्‌व्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेत असतील, तरीही पद्‌व्युत्तर अभ्यासक्रमासाठी पात्रता आवेदनपत्र व पात्रता शुल्क सादर करणे बंधनकारक आहे.

१४)पात्रता आवेदन पत्रासोबत खालील कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. कांही कागदपत्राच्या त्रुटी पूर्तते अभावी एखादया विद्यार्थ्याची पात्रता राखीव ठेवलेली असेल तर अशा विद्यार्थ्यास सदर त्रुटीची पूर्तता केल्याशिवाय पात्रता प्रदान केली जाणार नाही. तसेच अशा विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही याची नोंद घ्यावी व या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारू नये.

| अ.क्र. | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी | प्रकार |
|---|---|---|
| अ | पदवी अभ्यासक्रमासाठी १२वी चे गुणपत्रक (Statement of Marks) अथवा समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक | साक्षांकित छायाप्रत |
| ब | पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पदवीचे गुणपत्रक (Statement of Marks) अथवा समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक | साक्षांकित छायाप्रत |
| क | पूर्वी शिकत असलेल्या शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्राची (T.C.) | मुळप्रत व छायाप्रत |
| ड | खंड प्रमाणपत्र बाबत हमीपत्र आवश्यक आहे.(Gap Certificate)<br>(शिक्षणात खंड पडलेला असेल तरच) | मुळप्रत |
| इ | स्थलांतर प्रमाणपत्र Migration Certificate<br>(स्वा.रा.ती.म.विद्यापीठाबाहेरील विद्यार्थ्यासाठी) | मुळप्रत |
| ई | जातीचे प्रमाण पत्र (Caste Certificate)मागासवर्गीयांसाठी व आवश्यक तेथे जात वैधता प्रमाणपत्र Caste Validity Certificate,NCL,व्यावसायीक अभ्यासक्रमांसाठी | साक्षांकित छायाप्रत |

:पात्रता आवेदन पत्रासोबतची जोडपत्रे:

१५)अ.क्र. १४ मधील (क) प्रवेश पात्रता तपासणी करतेवेळेस विद्यार्थ्यांची शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र **(T.C.)** मुळ नसल्यास विद्यार्थ्यांचे प्रवेश रदद करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. अ.क्र. १४ मधील (क) वगळून इतर कागदपत्रांची पूर्तता करण्याचा दिनांक ३१.१०.२०२६ पर्यंत आहे. दिनांक. ३१.१०.२०२६ नंतर प्रति विद्यार्थी रू. ५००/— विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१६)प्रवेश पात्रते संदर्भात कोणत्याही विद्यार्थ्यास विद्यापीठात पाठवु नये.

१७)प्रवेश पात्रता तयार करतांना ज्या गुणपत्रका आधारे प्रवेश देण्यात येणार आहे त्या मुळ गुणपत्रकावरचे जे नाव आहे तेच नाव पात्रता आवेदन पत्रात लिहावे, यादीमध्ये नावात चूक झाल्यास, त्यास महाविद्यालय जबाबदार राहील.

१८)**CBCS** पॅटर्न नुसार पदवी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची संधी संपलेली आहे अशा विद्यार्थ्यांना **NEP** नुसारच प्रथम वर्षात प्रवेश देण्यात यावा.

१९)प्रस्तुत विद्यापीठ अतंर्गत महाविद्यालय बदल करण्यासाठी सदरील विद्यार्थी सर्व विषयात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अनुतीर्ण किंवा आसल्यास प्रवेश देवू नये.

२०)पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अन्य विद्यापीठातून अंतीम वर्षासाठी प्रस्तुत विद्यापीठात येणा—या विद्यार्थ्यास प्रवेश देतांना आशा विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेले श्रेयांक हे प्रस्तुत विद्यापीठाच्या श्रेयांक आराखडयाशी सुसंगत आहेत याची खात्री संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यानी घेणे आवश्यक आहे.

२१)विद्यार्थ्याच्या आवेदन पत्रात भ्रमणध्वणी क्रमांक व ई—मेल अचुक नमुद करावे.

२२)विद्यार्थ्यांनी पात्रता आवेदन पत्रात नमुद केलेले विषयच परीक्षा आवेदन पत्रावर नमुद करावे कोणत्याही परीस्थितीत विषय बदलता येणार नाही.

२३)पदवी अभ्यासक्रम — अन्य विद्यापीठातून पदवी प्रथम वर्ष उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यास संबंधित अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश देता येईल. मात्र प्रस्तूत विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे काही विषयाची समकक्ष परीक्षा देणे बंधनकारक आहे. यासाठी विद्यापीठाची परवानगी घेण्यात यावी.

२४)प्रभारी प्राचार्य यांनी पात्रता आवेदनपत्रावर स्वाक्षरी केलेली आहे, अशा प्रभारी प्राचार्य यांच्या नियुक्तीस विद्यापीठ मान्यता असलेल्या पत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

२५)अतिरीक्त तुकडी असल्यास, विद्यापीठ संलग्नीकरण व शासनमान्यतेचे पत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२६)ज्या महाविद्यालयांना प्रवेश क्षमते पेक्षा जास्त प्रवेश देण्यास विद्यापीठाने मान्यता दिलेली आहे, अशा मान्यता पत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे, त्या प्रवेश क्षमते पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची पात्रता मान्य करता येणार नाही.

२७)विद्यार्थ्यांची पात्रता विद्यापीठाने मान्य केलेली नसेल किंवा एखादा विद्यार्थी पात्रता आवेदन पत्र/शुल्क सादर न करता परीक्षेस बसला असल्याचे निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादनूक रद्द करण्यात येईल.

२८)व्यावसायीक अभ्यासक्रमांसंदर्भात केंद्रीय पध्दतीने होणाऱ्या प्रवेशाबाबत प्रवेश नियंत्रण समिती व बार कौन्सील ऑफ इंडीया, ए.आय.सी.टी.ई., डी.टी.ई. एन.सी.टी.ई, पी.सी.आय. इत्यादी प्राधीकरणांतर्गत होणाऱ्या प्रवेशा बाबत शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक आहे.

२९)व्यावसायिक अभ्यासक्रमातील द्वितीय वर्षातील प्रवेशीत विद्यार्थ्याचे MSBTE चे (**MIGRATION**) सादर करणे आवश्यक आहे.

३०)व्यावसायीक अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्याचे प्रवेश हे केंद्रीय पध्दतीने होत असल्यामुळे प्रवेश नियंत्रण समिती, **(ARA)** मुंबई यांची अंतिम प्रवेश मान्यता आल्यानंतरच पात्रतेची पुढील कार्यवाही केली जाईल. तसेच विद्यार्थ्याचे प्रवेश प्रक्रियेतील त्रुटींची पूर्तता प्रवेश नियंत्रण समिती मुंबई यांचे कडे करून अंतिम मान्यता यादी विद्यापीठास सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये यांची राहील. त्या शिवाय अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारले जाणार नाहीत. व त्यांना परीक्षेस बसता येणार नाही व पात्रता प्रदान करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

३१)**कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थांना किंवा त्यांच्या पालकांना त्रुटीची पूर्तता किंवा त्या संबंधीत कामासाठी विद्यापीठात पाठविण्यात येऊ नये. अशा सर्व त्रुटी महाविद्यालयीनस्तरावर संकलीत करून त्रुटीची पूर्तता करण्यास्तव महाविद्यालयीन कर्मचाऱ्यास पाठविण्यात यावे.**

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत: १)मा.कुलसचिव,प्रस्तुत विद्यापीठ
२)मा.वित्त व लेखाधिकारी,प्रस्तुत विद्यापीठ.
३)मा.संचालक उपकेंद्र,लातूर.
४)मा.संचालक उपपरिसर,परभणी.
५)मा.समन्वयक, कै.उत्तमराव राठोड अदिवासी संशोधन केंद्र, किनवट.
६)मा.प्राचार्य, न्यु मॅडेल डिग्री कॉलेज हिंगोली.